Registered No. B. 2289.



# अनुक्रमणिका.


| विषय. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १. | प्रेमात्मक विवाह—३ ... ... ... | १९३ |
| २. | बाहेरख्यालीचे दुष्परिणाम ( गुरुकिल्ली ) ... | २०० |
| ३. | वरील लेखास उत्तर ... ... ... | २०४ |
| ४. | पत्रव्यवहार ... ... ... | २०६ |
| ५. | प्रचलित विवाह ... ... ... | २११ |
| ६. | नवीन लेखांतील विचार ... ... ... | २१३ |
| ७. | ताजी व शिळी बातमी ... ... ... | २१४ |



संततिनियमनाकरितां

**'मॅटोरी' वड्या वापरा**

डझनाचे नळीस दीड रुपया.

**जेलोटयूब**

यानें गुप्त रोग बरे होत नाहींत, हें गुप्त रोगांचा प्रतिबंध करण्याकरतां पुरुषांनीं वापरण्याचें औषध आहे. वापरण्यास सुलभ व स्वस्त असून काळजीपूर्वक वापरल्यास रोग होणें शक्य नाहीं. फ्रान्समधील लष्करांतील, आरमारांतील व इतर हजारों लोक वापरतात. प्रसिद्ध फ्रेंच डॉक्टर गोडयुशो यांच्या सल्ल्यानें हें औषध एका फ्रेंच कंपनीनें तयार केलें आहे. दोन वेळ वापरण्याचे पेटीस १२ आणे. तीन पेट्यांस रु. २

सोल एजंटः—राइट एजन्सी,
२० भटवाडी रस्ता, गिरगांव, मुंबई.

# प्रेमात्मक विवाह-३.

विवाहांत भांडणाचें आणखी एक कारण म्हणजे गरीबी व मुलांचा मारा. केवळ गरीबीच असेल तर दोघांनींही काम करून आनंदांत राहतां येईल परंतु त्यांत मुलें झाल्यास उत्पन्न कमी व खर्च अधिक होतो. याला संततिनियमनाचे मार्ग गरिबांस सांगणें हा एकच मार्ग आहे. ही माहिति विवाहापूर्वी सर्वांस मिळणें जरूर आहे. अनौरसपणाचा डाग, बदनामी, गर्भपात, आत्महत्या यांपेक्षां संतति-नियमन बरें. मग नीतिबाज लोक कांहीं म्हणोत.

आतां अज्ञानाचा आणखी एक प्रकार पहा. हिल् नांवाचे एक ४४ वर्षांचे गृहस्थ व त्यांची ४२ वर्षांची बायको स्वतः धार्मिक असून मुलांसही त्यांनीं धार्मिक शिक्षण दिलें होतें. या वयांत तीं वेगळीं झालीं व बायकोला मीं याचें कारण विचारतां ती म्हणाली:—स्त्रीपुरुषसमागम ही मला हलकट गोष्ट वाटते. माझ्या आईलाही तसेंच वाटत असे. ती म्हणे बायबलांतच असें सांगितलें आहे व केवळ प्रजोत्पत्तीकरतांच ती क्षम्य आहे. नवऱ्याला मीं लग्नापूर्वी म्हटलं होतं कीं मला यांतलं कांहीं माहीत नाहीं, पण तो म्हणाला, त्याला हरकत नाहीं, तें मी पाहून घेईन. मला वाटलं कीं मुलं होण्याकरतां हें पाप क्षम्य आहे, पण पुढं पाहतें तों त्याला त्यांतच आनंद! सभ्य मनुष्याला याची किळस कशी येत नाहीं, हें मला समजत नाहीं. मला तर रात्र आली म्हणजे धडकी भरे. लग्नानंतर ९ महिन्यांनीं मला मूल झालं. मला अत्यंत लाज वाटली, व माझी एक अविवाहित मैत्रीण मला म्हणाली 'कां! अगदीं नऊ महिन्यांत मूल ना?' तेव्हां मला खूप संताप आला. पण आतां कोणाला लाजच वाटत नाहीं. तिला आतां दोन मुलं आहेत. आणि ती म्हणते, आणखी न होण्यास काय करावं हें मला माहीत आहे.

आमच्याजवळ पैसे असते तर कांहीं तरी जमलं असतं. पण लग्नानंतर माझ्या नवऱ्याला कायद्याचा अभ्यास करावासा वाटला. आधींच गरीबी त्यांत अभ्यासाचा खर्च आणि दर वर्ष दीड वर्षाला मूल, तेव्हां मी अगदीं बेजार झालें.

मीं म्हटलं 'पण तुम्ही नियमन कां नाहीं केलें?'

ती म्हणाली:—ब्रह्मचर्य हा एकच नीतीचा मार्ग आहे. म्हणून तर ईश्वरानें समागम इतका किळसवाणा केला आहे! आणि ईश्वराच्या इच्छेच्या विरुद्ध जाणं बरं नाहीं. त्याची इच्छा या बाबतींत अगदीं स्पष्ट आहे. बायबलांतच सांगितलं आहे. शरीराच्या दुसऱ्या किळसवाण्या क्रिया आहेत, त्यांतलीच ही एक. केवळ प्रजोत्पत्तीकरतां केली तर असो. पण लोकांना त्यांतच आनंद वाटतो, इतके लोक हलकट असतात. माझा नवरा तर अगदीं पशू आहे. गर्भारपणांत सुद्धां तो ऐकेना. हें तर पशू सुद्धां करीत नाहींत.

मी म्हणालों:—याबद्दलही मतभेद आहे, पण तज्ज्ञांचें मत या बाबतींत तुमच्या विरुद्ध आहे पशू चित्र काढीत नाहींत किंवा काव्य करीत नाहींत म्हणून मनुष्यानेंही करूं नये म्हटलं तर कसं होईल? तुम्हांला कामवासना नाहीं, म्हणून ज्याला असेल त्याला जबरीच्या ब्रह्मचर्यानें काय वाटेल याची तुम्हांला कल्पना नाहीं.

'त्यांत काय वाटायचं आहे?'

'समजा त्याला भूक नाहीं म्हणून त्यानें तुम्हांला उपाशीं ठेवलं असतं तर?'

'मीं या बाबतींत त्याचं ऐकलं नाहीं.'

'तुमचा संबंध झाल्याला किती दिवस झाले?'

'झाले सहा महिने. साधारण वर्षांतून एकदां म्हणजे पुष्कळ झालं. आम्हांला आतां आणखी मुलं नकों आहेत तेव्हां आतां समागम म्हणजे नुसता हलकटपणाच राहिला कीं नाहीं? नवरा पशू असला म्हणून मीही व्हावं काय?'

या बाईचें मन वळवणार कसें? तिची एक मोठी मुलगी नवऱ्याजवळ होती. ती त्याच्या संगतीनें बिघडेल, तेव्हां तिला दूर करण्याकरितां ती मजकडे आली होती.

नंतर मी तिच्या नवऱ्याजवळ बोललों. मुलगी आईजवळ राहण्यास खुषी नव्हती; व घटस्फोट मिळाल्याबरोबर दुसरें लग्न करण्याचा आपला विचार आहे, असें त्यानें सांगितलें.

# प्रेमात्मक विवाह

इकडे नवरा दुसरें लग्न करूं पहात आहे, ही बातमी बायकोला कळतांच ती मला म्हणाली:-आतां मी घटस्फोट करूं देते, वाट पहा!

नवरा दुसऱ्या स्त्रीकडे गेल्यास मी एकदम घटस्फोट करीन असें ती म्हणाली होती, याची आठवण दिली, तेव्हां ती म्हणते:-तें खरं, पण आतां त्याला घटस्फोट पाहिजे आहे. मग मी कशी देईन?

नंतर मुलीला बोलावली. तिनें बापाला एकदां दुसऱ्या स्त्रीबरोबर पकडल्यामुळें तिला पूर्ण स्वातंत्र्य मिळालें होतें. मात्र स्वतःची काळजी कशी घ्यावी हें तिला बापानें अगोदरच सांगून ठेवल्यामुळें तिला कसलीहि भीति नव्हती.

तिनें अजून कोणाशीं समागम केला नव्हता, पण जेव्हां कोणी मनासारखा भेटेल तेव्हां लग्नाशिवाय प्रथम एकत्र रहावें व मग दोघांसही पसंत असल्यास लग्न करून नंतर मुलें होऊं द्यावींत, असा तिचा विचार होता; तिला मुलांची फार आवड होती.

माझें लक्ष तिच्या आंखूड झग्यावर गेलेलें पाहून ती आपला झगा आणखी थोडा वर उचलून म्हणाली:—हा नुसता संवयीचा प्रश्न आहे. आम्ही केंस मानेपर्यंत कापले तेव्हां म्हाताऱ्या बायांनीं पुष्कळ ओरड केली. पण कोणी ऐकत नाहीं असें पाहून त्याही आमच्यासारखें करूं लागल्या. कपडे काढायला अंधाराची जरूर नसते हेंही त्यांना लवकरच समजेल.'

कपड्यांचा जर कांहीं उपयोग असेल तर तो शोभा किंवा थंडीवाऱ्याचें निवारण हाच होय. प्राचीन ग्रीस देशांत तरुण व तरुणी नग्न स्थितींत खेळत असत व जपानांत स्त्रीपुरुष नग्न होऊन स्नानगृहांत एकत्र स्नान करितात. हे दोन्ही लोक आमच्यापेक्षां अधिक नीतिमान् होत.

... .. ... ... ... ... ... ... ... ...

येईल त्या पुरुषाशीं संबंध ठेवणें कोणत्याहि स्त्रीला पसंत असणें शक्य नाहीं. तेव्हां या बाबतींत स्वातंत्र्य दिल्यास कायद्यानें पशुवृत्तीस उत्तेजन मिळेल ही भीति निराधार आहे. मनुष्य स्वभाव इतका नीच नसतो व वरील विधानें करणारास मनुष्यस्वभावाची ओळख नाहीं हेंच खरें.

प्रेम विचित्र असतें. सतरा वर्षांची इनेझ व वीस वर्षांचा फ्रेड काहीं दिवस एकत्र राहून नंतर स्वखुषीनें लग्न करून कांहीं महिन्यांनीं वेगळीं झालीं व घटस्फोटाकरितां मजकडे आलीं. ती बापाकडे परत गेलीच होती व तो सामानसुमान विकून तिला त्याचे पैसे देऊन मोकळा झाला होता. तीं एकमेकांचा द्वेष करीत नव्हतीं, पण त्यांचें जमेना म्हणून तीं आलीं होतीं. त्यांना कांहीं दिवसांनीं घटस्फोट देण्याचें मी कबूल केलें. तो देण्याचे अगोदर तीं पुनः एकत्र राहूं लागलीं अशी मला बातमी लागल्यावरून मी इनेझला बोलावून सांगितलें कीं तुह्मी एकत्र राहतां तेव्हां तुम्हांला घटस्फोट मिळणार नाहीं. ती म्हणाली:–' आम्हांला वाटलं घटस्फोट झाला म्हणून तर आमचं पुनः पटलं ! ' म्हणजे लग्न झाल्यास त्यांचें पटत नाहीं, आणि मोडल्यास पटतें, असें झालें. हा त्यांचा दोष नव्हे, विवाहसंस्थेचा आहे.

वास्तविक पाहतां विवाहाच्या कोणत्याही प्रकारांत अपस्मार, वेड, गर्मी वगैरे सांसर्गिक किंवा आनुवंशिक रोग दोघांसही नसले तरच विवाहास परवानगी द्यावी; आनुवंशिक रोग असल्यास शस्त्रक्रियेनें जननशक्ति नाहींशी करून परवानगी द्यावी; व सर्वांस संततिनियमनाची माहिती द्यावी. असें केल्यास हल्लींपेक्षां हजारों विवाह जास्त होतील, कारण विवाहांतील धोका नाहींसा होईल.

कामवासना भुकेइतकीच सरळ, साधी, नैसर्गिक व नैतिक गोष्ट आहे. तिला ' पाशवी ' वगैरे शिव्या देऊन नानाप्रकारचीं बंधनें घातल्यानेंच ती पिसाळते. कोणत्याही मनुष्याला अन्न मिळूं दिलें नाहीं तर तो अधाशी होईल, अन्न चोरील आणि भीतीनें गुप्तरीतीनें खाईल. नीतिबाज लोकांमुळें कामवासना पिसाळली आहे, ती ताळ्यावर यावी अशीच आमची इच्छा आहे.

हल्लींच्या विवाहाचे परिणाम पहा. कॅथरीन व जार्ज यांचा चोरून व्यवहार असे. तोच उघडपणें करतां यावा म्हणून त्यांना लग्न करण्याची बुद्धी सुचली. त्यांनीं वेगळी जागा घेऊन घर थाटलें. तिनें नोकरी सोडली, त्यामुळें मिळकत निमे झाली. तिनें आपले सगळे पुरुष मित्र सोडले व तो इतर मुलींकडे पाहीनासा झाला. विवाहांत मत्सर हा सद्गुण असल्यामुळें तीं एकमेकांवर सक्त पहारा ठेवूं

लागलीं. शेवटीं तीं मजकडे येऊन त्यांना घटस्फोट द्यावा लागला, व तीं नंतर तशींच चोरून व्यवहार ठेवूं लागलीं असावीं असा माझा तर्क आहे............

कामवासनेशिवाय इतर महत्वाच्या गोष्टी जगांत आहेत. परंतु जगाच्या मूर्खपणामुळें तिलाच फाजील महत्त्व मिळत आहे.

एकदां माझा मित्र जॉन् कॉमस्टॉक मजकडे आला. त्याच्या मुलीनें आपल्याच कॉलेजांतल्या एका मुलाशीं लग्न केलें होतें. बाप शहाणा असल्यामुळें तो विनाकारण न संतापतां, जरूर पडली तर हें लग्न मोडतां येईल कीं नाहीं असें मला विचारायला आला होता. मी म्हटलें:—मोडतां येईल, पण घाई करूं नको. तुझी मुलगी मी पाहिली आहे त्यावरून तिची कामवासना जोमदार आहे हें मी सांगतों. ती जागृत झाली, म्हणजे ब्रह्मचर्याच्या गप्पांचा कांहीं उपयोग होत नाहीं. नुकताच मी एका मिश्र कॉलेजांतील स्त्रियांच्या अधिकारिणीशीं बोलत होतों. विवाहित विद्यार्थ्यांत अधिक समाधानवृत्ति दिसते व तेच अधिक यशस्वी होतात असें तिचें मत पडलें. तेव्हां तुझ्या मुलीनें केलें तेंच बरोबर म्हटलें पाहिजे. एरव्हीं त्यांना ५।७ वर्षें पर्यंत वाट पहावी लागली असती व तें सर्व दृष्टींनीं वाईट. प्रकृति, काम करण्याची ताकद, सर्व यामुळें सुधारेल.

'पण त्यांना मूल झालं तर काय होईल ? तो तर अजून विद्यार्थी आहे.'

'तिच्या मैत्रिणींवरून पाहतां तिला संततिनियमनाची माहिती बहुधा असेलच. शिवाय एखाद्या डॉक्टराकडून तिला योग्य माहिती दिली म्हणजे झालं............आणि नच पटलं तर घटस्फोट आहेच. मी ज्याला 'प्रेमात्मक विवाह' म्हणतों तोच हा. जरूर तोंपर्यंत संततिनियमन, दोघांचे पटतें व सुखानें राहण्याइतके पैसे मिळतात असें ठरल्यावर पुढें संतति व तेथपर्यंत केवळ त्यांतील एकाच्या खुषीनें सुद्धां घटस्फोट करण्याची मुभा, इतक्या गोष्टीची त्याला जरूर आहे. हल्लीं सुद्धां तें आहेच, पण कायद्यांच्या मूर्खपणामुळें संततिनियमन फसलें तर गर्भपात, आणि जरूर तर जज्जाच्या डोळ्यांत धूळ टाकून घटस्फोट करावा लागतो. तेंच राजरोस शास्त्रीय मार्गांनीं संततिनियमन व केवळ खुषीवर घटस्फोट करतां यावा, इतकेंच माझें म्हणणें आहे आणि अज्ञानामुळें

होणारे अनर्थ टाळण्याकरतां कामशास्त्राचें शिक्षण देणारी एक संस्था असा म्हणजे झालं !

'त्याला तुम्ही 'रतिमंदिर' म्हणतां नाहीं का ?'

'नांव अन्वर्थक आहे. आधुनिक शास्त्रीय पद्धतीचं शिक्षण त्यात दिलं पाहिजे.'...........

एकदां एक विवाहित तरुणी मला म्हणाली:–'मला तुमचीं मतें पसंत आहेत आणि मी नेहमीं तुमच्या बाजूनें भांडतें. पण प्रेमात्मक विवाह मात्र मला पसंत नाहीं. पाहिजे तेव्हां लग्न करायला आणि मोडायला जर परवानगी दिली, तर स्वैर वर्तनाला मोकळीक होईल. आणि लोक एका लग्नाचा कंटाळा आला कीं मोडून दुसरं करूं लागतील !'

मीं म्हटलं: 'तुला मुलं किती आहेत ?'

'म्हणजे ? मला मुलं नाहींत, तुम्हांला माहीत आहे !'

'तुझ्या लग्नाला किती वर्षं झालीं ?'

'चार वर्षं.'

'तुला चार वर्षांत मूल नाहीं झालं ?'

'मुलं आम्हांला परवडलीं नसतीं. लॅरीला जेमतेम पोटापुरते पैसे मिळत आणि मी नोकरी सोडली तर कसं झालं असतं ? शिवाय माझी प्रकृतीही ठीक नव्हती. आतां मी बरी आहें आणि लॅरीला पैसेही चांगले मिळतात. आतां होतील मुलं.'

'बरं, हें तुम्हीं लग्नापूर्वी ठरवलंत कीं नंतर ?'

'अर्थात् अगोदर.'

'तर मग जरूर पडेल तोंपर्यंत संतति बंद ठेवायची असं ठरवूनच तुम्हीं लग्न केलंत. हाच प्रेमात्मक विवाह.

'पण आमचं परस्पर प्रेम होतं, आणि लग्न मोडायच्या उद्देशानं नाहीं आम्ही केलं.

'पण समज, आपली चूक झाली असं तुम्हांलाच वाटूं लागलं तर त्यांतून बाहेर पडायचा मार्ग पाहिजे कीं नाहीं ?'

'पण आमचं हें खरं लग्न आहे, आमचं प्रेम आहे आणि आमची एकत्र रहायची इच्छा आहे.'

'सगळेच प्रथम असं म्हणतात, परंतु कांहीं फसतात. त्यांना राजरोस लग्नाचा करार रद्द करतां आला पाहिजे, इतकंच मी म्हणतों. आणखी पुष्कळ सुधारणा करतां येण्यासारख्या आहेत. उदाहरणार्थ सुदृढ आईबाप गरीब असल्यास त्यांचीं मुलें सरकारी खर्चानें वाढवतां येतील, व याकरतां निपुत्रिकांवर कर बसवतां येईल. हल्लीं आरोग्याचा कोणी विचारच करीत नाहीं. रोगी लोकांना प्रजोत्पादनाची सदर परवानगी आहे, यामुळें वेड्यांचीं इस्पतळें, तुरुंग वगैरेवर निष्कारण खर्च होतो. अमेरिकेंत प्रतिवर्षी रोगी व गुन्हेगार यांचे पायीं कोट्यवधि डॉलर खर्च होतात. वैद्यकाच्या प्रगतीमुळें आपण रोगट लोकांस मरूं देत नाहीं. पूर्वी रोगी लोक मरून सशक्त तेवढेच शिल्लक रहात असत. अर्थात् रोग्यांना मरूं द्यावें असें मी म्हणत नाहीं, परंतु संतति निरोगी होईल असे उपाय योजले पाहिजेत. लग्नापूर्वी तपासणीची पद्धत पडल्यास गुप्त रोग कमी होतील. हल्लीं शेंकडा ५० पुरुषांना एखादे वेळीं तरी यांपैकीं एकादा रोग होतो. इलिनॉइस् संस्थानांतील आरोग्याधिकाऱ्यानें असें प्रसिद्ध केलें आहे कीं वयाच्या २१ व्या वर्षापासून ३० व्या पर्यंत निमे तरुणांस गुप्त रोग होतात. अर्थात् स्वैरसंभोग करणाऱ्या सर्वांसच रोग होतात असें नाहीं; यावरून किती अविवाहित लोक ब्रह्मचारी राहतात हें दिसेल. पंधरापासून तीस वयाच्या तरुणांपैकीं एक तृतीयांशच विवाहित असतात. बाकीचे दोन तृतीयांशांनीं कामवासना दाबून टाकली पाहिजे म्हणण्यांत काय अर्थ आहे? ती इतकी सहज दाबली जात नाहीं.'

'पण घटस्फोट सोपा केला तर लोक भराभर काड्या मोडून देतील. त्याचं काय?'

'समज तुला उद्यां मोकळीक दिली, तर तूं लगेच काडी मोडून देशील?'

'मी नाहीं देणार. माझी गोष्ट निराळी. पण लोक देतील.'

'तूंच काय स्वर्गांतून उतरली आहेस? इतर लोक सुद्धां असेच असतात. प्रेमाच्या गांठी इतक्या सहज सुटत नाहींत. नाइलाज झाल्याशिवाय बहुतेक

लोक लग्न मोडायला तयार होत नाहींत. पण ज्यांना वारंवार नवीन संबंध पाहिजे असतील, त्यांना हल्लींही तसे करतां येतातच. त्यांची प्रेमात्मक विवाहानें मुळींच सोय होणार नाहीं. ते विवाहाच्या भानगडींतच कशाला पडतील ? ज्यांना नेहमीं एकत्र रहाण्याची इच्छा असेल त्यांच्याच करतां विवाह आहे. पण चूक झाली तर दुरुस्त मात्र करतां आली पाहिजे. शिवाय जरी अशी कल्पना केली की उनाड स्वभावाच्या लोकांनीं प्रेमात्मक विवाह करून वारंवार मोडले तरी त्यांतही फायदाच आहे. हल्लीं उच्च कुटुंबांतील मुली सुद्धां कधींकधीं दहावीस मुलांशीं संबंध केल्याचें कबूल करतात व मुलांचेंही तसेंच. यापेक्षां तात्पुरते विवाह केलेले काय वाईट ?

( अपूर्ण )

---

# बाहेरख्यालीचे दुष्परिणाम

( लेखक—गुरुकिल्ली )

आहार निद्रा भय व मैथुन हे प्रत्येक जीवाचे चार गुण आहेत, त्यांतच मनुष्याचा अंतर्भाव होतो. तथापि मनुष्य हा सर्व जीवांमध्यें बुद्धिवान असल्यामुळें त्यानें आपलें साम्राज्य या पृथ्वीच्या पाठीवर स्थापिलें. वरील चार गुणांपैकीं आहार व मैथुन या दोहोंच्या बाबतींत मनुष्यानें जी अचाट बुद्धिमत्ता दाखविली तीच त्याच्या नाशास कारण झाली, परंतु त्यांतूनहि मनुष्यानें आपली सोडवणूक बुद्धीच्याच जोरावर करून घेतली.

मनुष्याला शरीरपोषणाकरितां जशी आहाराची जरूरी आहे त्याचप्रमाणें संततिकरितां मैथुनाची आवश्यकता आहे. या दोनहि क्रियांमध्यें मनुष्याला विशेष सुख लागलें म्हणून त्यानें आपली लालसा पुरविण्याकरितां अनेक मार्गहि शोधून काढले. मनुष्य आपलें अन्न कच्चें, पक्कें, शिजवून, तळून व मसाले घालून खातो त्याप्रमाणें पशुपक्ष्यांना करितां येत नाहीं; परंतु यामुळें त्यांना मनुष्याइतकी शरीरव्याधि व त्यावर औषधोपचार यांची जरूरी लागत नाहीं. अगदीं तसाच प्रकार मैथुनाचे बाबतींतहि मनुष्य व पक्षी यांच्यामध्यें दृष्टीस पडतो.

मैथुनासंबंधीं पशुपक्षी जसे कालमानाला बांधलेले आहेत तसे ते नात्यागोत्याला बांधलेले नाहींत. मनुष्यानें या बाबतींत जें जें केलें ते आहारसुखाहूनहि फारच विचित्र आहे. शृंगारिक काव्यें करून मनुष्य तीं गाऊं लागला, त्याचप्रमाणें मातीच्या प्रतिमा बनवून अगर तीच कल्पना कागदावर रंगवून मनुष्य आपली हौस पुरवून घेऊं लागला व एवढ्यानेंच न थांबतां अनेक प्रकारचीं कामोद्दीपक औषधें घेऊन मनुष्य आपल्या विषयांत दंग होऊन गेला. या बाबतींत अतिक्रमण करणाराला नानाप्रकारच्या व्याधि भोगाव्या लागून पुढें होणाऱ्या संततीला आपल्या प्रारब्धाचें फळ म्हणून यमयातना भोगाव्या लागल्या (१) हें सर्व ओळखून पूर्वीच्या काळीं समाजस्वास्थ्याकरितां धर्मसंस्थापकांना स्त्रीपुरुषांच्या संबंधाला विवाह–विधीचें स्वरूप द्यावें लागलें, (२) परंतु हल्लींची परिस्थिती पूर्वीच्या मानानें फारच बदलेली असून तिची अजून चढतीच कमान आहे.

बाहेरख्यालीचे दुष्परिणाम व त्यांचा प्रसार या विषवृक्षाच्या मुळाशीं अनीतीचें पाणी कसें मुरत असतें हे आपण थोडक्यांत पाहूं. 'हौशा' व 'हौशी' या नांवाच्या (विवाहित अथवा अविवाहित) निरोगी जोडप्यानें एकमेकांना सोडून दुसऱ्या कोणत्याही स्त्रीपुरुषांबरोबर मैथुन व्यवहार केला नाहीं तर त्यांना बाहेरख्यालीचे दुष्परिणाम (चट्टा, परमा, उपदंश) कधींहि भोगावे लागणार नाहींत. (२) परंतु या दोघांची भूक कोणत्या तरी कारणानें एकमेकांवर न भागतां बाहेर भराऱ्या मारूं लागली आणि तेथें अगोदरच हें वीष पेरलेलें असलें तर त्याची लागवड या दोघांमध्यें सहज होते. परंतु एवढ्यानेंच ही चटक थांबत नसून या हौशाच्या ' गोदी ' नामक पात्राशिवाय ' सुंदरा ' नांवाची एक प्रियकरीण असते, तेथपर्यंत हा प्रसाद पोंचता होतो, आणि अर्थात या गोदीचा व सुंदरीचा जो नवरा ह्मणून असेल तोहि या विकारांनीं भारला जातो. एवढें कर्तृत्व मूळ हौशामध्यें नसेल तर त्याची हौशी तें करण्याला समर्थ असते. कारण हौशाशिवाय सुंदररावासारखा तिचा कोणी तरी प्रियकर असतो, त्याच्यापासून हा विकार तिनें घेतलेला तो आपल्या नवऱ्याला दिलेला असतो, अथवा तिला नवऱ्यापासूनच हा विकार प्राप्त झालेला असेल तर तो तिच्यापासून सुंदररावाला मिळतो. या सुंदररावाची आणखी कोणीतरी एखादी (×) असते किंवा सुंदरीचा दुसरा

कोणी तरी ( × ) असतोच ! अशा रीतीनें एका पुरुषाचा अनेक स्त्रियांशीं अथवा एका स्त्रीचा अनेक पुरुषांशीं जितक्या जास्त खुल्या दिलानें व्यवहार होत जाईल तितक्या लवकर हें विषारी झाड फोफावूं लागतें. ( ४ )

वरील वर्णन इतकें सविस्तर व खुलें करून सांगण्याचें कारण असें कीं, सामान्य सुशिक्षित वर्गाला सुद्धां या यौवन यंत्राचें जाळें विशेष उलगडतां यावें. दुसरें असें कीं, प्रत्येक वेळीं वांकडें पाऊल पडलेल्या मनुष्याला आपली स्वतःची चूक बरोबर समजते परंतु त्या जाळ्याचे धागे किती लांबवर पसरलेले व कोणत्या गढुळ पाण्यांत धुतले जात असतात याची त्याला कल्पनाहि नसते.

बाहेरख्यालीच्या विकारासंबंधांत स्त्रीपुरुषांना शारीरव्याधि सारखीच भोगावी लागली तरी आगंतुक संततीमुळें अविवाहित व विधवा स्त्रियांवर जी बे-अब्रूची आपत्ति येऊन कोसळते तिच्यापासून पुरुष वर्ग अजीबात बचावतो हें मात्र खरें आहे.

वरीलप्रमाणें स्त्रीपुरुषांच्या अनियंत्रित व्यवहाराला 'बाहेरख्याली' व 'अनीति' असे सामान्य शब्द आम्हीं वापरले. याचें कारण, असल्या फंदांत पडणाऱ्या प्रत्येक मनुष्याला केव्हां व कोठून शारीरव्याधि भोगावी लागेल याचा नियम नाहीं. दुसरें असें कीं, असलें विषयसुख बाजारांत विकत मिळालें अथवा विशेष सलगीमुळें खासगी रीत्या परंतु चोरून जरी तें कोणाला लाभलें तरी सामाजिक दृष्ट्या ती हानीच म्हणावी लागेल ( ५ ). तथापि विषम मनोवृत्तीच्या परंतु विवाहानें बांधलेल्या स्त्रीपुरुषांच्या समागमाला 'नीति' असें म्हणतां येणार नाहीं हेंहि आह्मांला कबूल आहे. याशिवाय विवाहानंतर उत्पन्न होणाऱ्या संततीचा प्रश्न जसा आपोआप सुटतो ( ६ ); तसा तो अनीतीच्या संबंधांत सुटत नाहीं आणि जोंपर्यंत सुधारलेलीं मनुष्यें सुद्धां पशुपक्ष्यांप्रमाणें नागवींच न राहतां आपलीं शरीरें कपड्यांच्या सौंदर्याकरितां व थंडीवाऱ्याकरितां म्हणून 'मर्यादे' खातरहि झांकतात हें खरें आहे तोंपर्यंत केवळ विषयवासनेला प्राधान्य देऊन आपल्या उघड्या शरीराला दुसऱ्या उघड्या माणसाकडून स्पर्श होऊं देणें हें पशुवृत्तींत नको असेल तर निदान 'अनीती'च्या सदराखालीं येतें ( ७ ). येणेंप्रमाणें मनुष्यामधील स्त्रीपुरुषांचा संबंध अत्यंत गुंतागुंतीचा आहे तसा तो पशुपक्ष्यांमध्यें नाहीं. तथापि धार्मिक दृष्ट्या

पुरुषांना एकपत्नीव्रत आणि स्त्रियांना पातिव्रत्य या प्राचीन कल्पनांमध्यें वैयक्तिक व सामाजिक स्वास्थ्याचा शुद्ध झरा फार खोलपर्यंत गेलेला होता असें दिसतें. आजकाल धर्माला ओहोटी लागलेली असून जिकडे तिकडे विचारस्वातंत्र्य संचारूं लागल्यामुळें आम्हांला तेवढ्यापुरताच विचार करावयाचा आहे.

गेल्या २५।३० वर्षांत हिंदुस्थानांतील पुण्यामुंबईसारख्या मोठाल्या शहरांमधून पाश्चात्य पद्धतीची विशेष छाप दिसून येते. त्यांत मुलांमुलींचें शिक्षण, प्रौढविवाह व स्त्रीस्वातंत्र्य यांना विशेष महत्व दिलें पाहिजे. सध्यांच्या राहणींत एका बाजूनें धर्माला फांटा तर दुसऱ्या बाजूनें चित्ताकर्षक विदेशी छानछोकी बळावूं पहात आहे. त्यांतच स्त्रीपुरुषांच्या संबंधांत साहेबांच्या उदाहरणांवरून ' नीती ' चा प्रश्न वितळत चालला आहे ( ९ ). या सर्व गोष्टी विचारांत घेतां आणखी थोड्या वर्षांनीं हिंदी लोक अमेरिकेप्रमाणें कर्तृत्ववान जरी झाले नाहींत तरी व्यभिचार हा शब्दच येथून मावळून जाईल कीं काय अशी भीती वाटते. याचें कारण येथील शिकलेल्या अनेक विवाहित लोकांना संततिनियंत्रणापेक्षां विषयव्याधिसंरक्षणाची अधिक आवश्यकता भासत आहे. ( १० )

आमच्या मतें, प्रत्येक मनुष्याच्या मनाला जसें वळण लावावें त्या दिशेनें तें विचार करूं लागतें. मनुष्याला कांहीं एक उद्योग नसला व झोंपेशिवाय कांहीं तरी उद्योग करणें भागच पडलें तर तो खाण्याची क्रिया करतो. याशिवाय तारुण्याच्या भरांत निरुद्योगी माणसाला तशीच एखादी तरुणी भेटली तर तो पाण्यांतील मातीच्या ढेंकळाप्रमाणें विरघळून जाईल यांत नवल नाहीं. परंतु अशी स्थिती उद्योगी माणसाची होत नाहीं. विषयसुखाकरितां विवाहाचें जन्माचें लोढणें नको आणि दररोजच्या निर्वाहाकरितां लागणाऱ्या अन्नपाण्याप्रमाणें विषयसुखाची भूक प्रत्येक माणसाला लागणें अगदीं साहजिक आहे, एवढेंच पाश्चात्य शिक्षण हिंदी लोकांना प्रामुख्यानें मिळणार असेल तर त्यांच्या अधोगतीला पारावार नाहीं. असें असून सुद्धां आधुनिक परिस्थितीचा विचार करितां प्रत्येक प्रौढ स्त्रीपुरुषानें संततिनियंत्रण व गुप्त रोगांपासून बचाव यांची माहिती करून घेणें अत्यंत आवश्यक आहे. विशेष माहितीकरितां संपादक समाजस्वास्थ्य यांना लिहा.

# वरील लेखावर टीका.

पूर्वग्रहांच्या पगड्यांतून सुटणें किती दुष्कर आहे हें वरील लेखावरून विचारी मनुष्याच्या लक्षांत येईल.

( १ ) गर्मी, परमा वगैरे रोग संभोगातिरेकानें किंवा स्वैरसंभोगामुळें किंवा वेश्येमुळें उत्पन्न होत नसून विशिष्ट जंतूमुळें होतात ही गोष्ट आज निर्विवाद आहे. अनेक निरोगी माणसांत कितीही अतिरेक किंवा स्वैरविहार झाला तरी त्यांत गर्मी किंवा कोणताही जंतुजन्य रोग होणें शक्य नाहीं.

या बाबतींत पुष्कळ लेखक पशूंची स्तुति करतात, व लगेच 'पशुवृत्ति' हा शब्द शिवी म्हणूनही वापरतात! अमेरिकेंत 'लामा' नांवाचा, उंटाच्या जातीच्या परंतु त्यापेक्षां लहान प्राणी आहे, त्यापासून गर्मीचा रोग मनुष्यास लागला, व तेथून कोलंबसाबरोबरच्या लोकांनीं तो यूरोपांत आणला व तेथून तो पूर्वेकडील देशांत पसरला, असें तज्ज्ञांचें म्हणणें आहे. तेव्हां मनुष्यानें अतिक्रमण केल्यामुळें हा रोग झाला व पशूंस तो होत नाहीं हें खोटें आहे.

२. विवाहाच्या विधीनें रोगांचा प्रश्न सुटत नाहीं. उलट प्रजोत्पादन हेंही त्याच धर्मसंस्थापकांनीं प्रत्येक जोडप्याचें कर्तव्य ठरविलें, व गर्मीसारख्या आनुवंशिक रोगांच्या प्रसारारा मदतच केली. रोगी जोडप्यांना संततिनियमनाचे मार्गच सांगावयास पाहिजेत, व ते शोधून काढण्याइतकी अक्कल त्यांस खास होती.

३. या रोगांस बाहेरख्यालीचे परिणाम म्हणणें चूक आहे. हे रोग बाहेरख्याली न करणारांसही होतात व करणाऱ्या सर्वांस होतातच असें नाहीं.

४. वर सांगितलेंच आहे कीं हे रोग जंतू असतील तरच होतात, यांत खुल्या दिलाचा कांहींएक संबंध नसतो.

५. याला म्हणतात पूर्वग्रह. विवाहव्यतिरिक्त संभोग म्हणजेच सामाजिक हानि अशी लेखकाची कल्पना आहे, व याचें कारण दिलेलें नाहीं.

# वरील लेखावर टीका

६. संततीचा प्रश्न आपोआप सुटत नाहीं. फाजील संतति झाल्यास त्यांस इतर लोकांनीं पोसावें लागतें, किंवा त्यांचे हाल होतात.

७. सुधारलेल्या माणसांत नागवें राहण्याची चाल नाहीं हें खरें, तथापि नागवें राहण्यांत फायदा आहे असें कांहीं लोक म्हणूं लागले आहेत; व यास उत्तेजन देण्याकरतां कांहीं संस्था फ्रान्स, जर्मनी वगैरे देशांत स्थापन झाल्या आहेत. 'आपण नागवें राहणें इष्ट आहे काय ?' अशा नांवाचा एक फ्रेंच ग्रंथ छापत आहे. परंतु यांत नीतीचा संबंध काय ? एका उघड्या शरीराला दुसरें उघडें शरीर लागलें तर तिसऱ्याचें काय बिघडलें ? जोंपर्यंत त्यांत तिसऱ्याचें नुकसान नाहीं तोंपर्यंत ती अनीति नाहीं.

८ पुरुषांस एकपत्नीव्रताचें बंधन धार्मिक दृष्ट्या कधींही नव्हतें. स्त्रियांस मात्र पातिव्रत्याचें होतें व आहे, तरी द्रौपदीसारखीं उदाहरणें प्राचीन ग्रंथांतच आहेत. या व्रतांनीं वैयक्तिक स्वास्थ्य मिळत नाहीं, हें उघड आहे, एरव्हीं बाहेरख्यालीचें कारणच नव्हतें.

९. हल्लींच्या पिढ्यांची नीति मागील पिढ्यांपेक्षां कमी असा लेखकाचा समज दिसतो. हें साफ खोटें आहे. 'हल्लींच्या लोकांत कांहीं दमच नाहीं, आमच्या बरोबरीचे लोक म्हटले म्हणजे नुसत्या बायकोवर भागायचं नाहीं, एखादं तरी अंगवस्त्र असायचंच', अशी बढाई मारणार म्हातारे आम्हांस बरेच भेटले आहेत. म्हणजे अंगवस्त्राची पद्धत होती इतकेंच नव्हे, तर त्यांत कांहीं वाईट आहे असेंही त्यांस वाटत नसे. हें साहेबांचें अनुकरण नव्हे, हा मूळचाच गुण आहे.

१०. हें विधान साफ खोटें आहे. राइट एजन्सीनें संततिनियमनाच्या साधनांबरोबरच गुप्त रोगांपासून बचावाचीं साधनेंहि विकावयास ठेवलेलीं आहेत. परंतु पहिल्या साधनांच्या मानानें दुसऱ्यांची चौकशी फारच थोडे लोक करतात, असा त्यांचा अनुभव आहे. यावर लोक कदाचित् असें म्हणतील कीं दुसरीं साधनें मागावयास लोक अधिक लाजतात. परंतु रबरी टोपीप्रमाणें यांत आकाराचा प्रश्न नसल्यामुळें नोकर पाठवून सुद्धां हीं मागवतां येतात, व कांहीं लोक तशीं मागवतातही. असें केल्यास तीं कोण वापरणार हें कळण्याचें

कारण नसतें. शिवाय, तीं एका मित्राकरतां पाहिजेत असें सांगण्याची सोपी युक्ति असतेच. कोणास पाहिजेत हा प्रश्न विकणाराचा नव्हे.

एकंदरींत हल्लींच्या पिढीला व साहेबांना विनाकारण शिव्या देण्यांत आम्हांस कांहीं अर्थ दिसत नाहीं. आमचे पूर्वज मूर्ख होते असें आमचें ह्मणणें नाहीं, परंतु त्यांना ज्या गोष्टी त्यांच्या परिस्थितींत योग्य दिसल्या, त्याच आम्हांस आमच्या परिस्थितींत दिसल्या पाहिजेत असें ह्मणणें म्हणजे स्वतःची अक्कल गहाण टाकणें आहे व असले वंशज आमच्या पूर्वजांस भूषणप्रद होतील असें नाहीं. 'ते दिवस गेले आतां, नाहींतर आमच्या वेळेला... !' असें म्हणण्याची कांहीं लोकांना संवयच असते, इतकेंच. समंजस लोकांनीं तिकडे लक्ष देतां कामा नये.

---

# पत्रव्यवहार.

१.

२-२-२९

सा. न. वि. वि. आपलें मासिक, विशेषतः त्यांतील पत्रव्यवहार मी उत्सुकतेनें वाचतों. आपण सर्व पत्रांस उत्तरें देतां, परंतु तीं कधीं कधीं समाधानकारक नसतात व त्यामुळें शंकानिवृत्ति होत नाहीं. स्त्रीपुरुषसंबंधाविषयीं आपली मतें क्रांतिकारक आहेत, यामुळें पुष्कळ लोक आपलें मासिक उघडपणें वाचण्यास भितात. परंतु तो प्रश्न सध्यां बाजूला ठेवला तरी या प्रश्नासंबंधीं लोकमत अजमावण्यास आजपर्यंत मार्ग नव्हता, तो आपल्या मासिकानें मिळाला. पुष्कळ लोकांस आपले दाबून ठेवलेले मनोभाव या मासिकाच्या द्वारें मोकळेपणानें मांडतां येतात व यासंबंधीं विचारविनिमय करतां येतो; यावरून अशा एखाद्या पत्राची जरूर होती हें स्पष्ट दिसतें. आपल्या मासिकानें ही उणीव भरून काढली आहे.

आपला

डॉ. × × ×

[ आमच्या उत्तरांनीं नेहमींच समाधान होणार नाहीं, हें आम्ही जाणून

आहों, परंतु आमचें मतें त्याचें कारण असें आहे कीं ज्या बाबतींत लोकांचे मना-वर पूर्वग्रहांचा पगडा असतो, त्या बाबतींत युक्तिवाद करण्याची त्यांची तयारी नसते. धार्मिक मनुष्यास धर्मामुळें होणारें नुकसान प्रत्यक्ष दाखविलें तरी तिकडे डोळेझांक करण्याची त्याची प्रवृत्ति असते. तसेंच शास्त्रीय दृष्ट्या व्यभिचार हा दुर्गुण नाहीं, ह्मणजे त्यामुळें कोणतेंहि शारीरिक नुकसान होत नाहीं, व मानसिक होत असलें तर तो दुर्गुण मानल्यामुळेंच होतें; कौमार्य ही एक विशेष मौल्यवान् चीज समजण्याचें कांहीं कारण नाहीं; कोणत्याहि दोन सज्ञान माणसांचा संभोग ही त्यांची खाजगी गोष्ट आहे व जोंपर्यंत त्यापासून अनिष्ट संतति किंवा रोगप्रसार होत नाहीं, तोंपर्यंत समाजास मध्यें पडण्याचें कारण नाहीं, वगैरे सरळ गोष्टी पारंपरिक माणसास पटाव्या कशा? या बाबतींत पुष्कळ वेळां युक्तिवादांत आपलें चालत नाहीं, अशी खात्री झाल्यावर हे लोक म्हणतात:– 'हें पहा, आम्ही वादांत हरलों तरी त्यामुळें आम्हांला वाद करतां येत नाहीं इत-केंच सिद्ध होईल; पण म्हणून आम्ही तुमचं म्हणणं कबूल करूं असं नाहीं.' या लोकांस आमचेपाशीं उत्तर नाहीं.–सं. ]

२. ठाणें, ५–२–२९.

सा. न. वि वि. अनुकूल प्रतिकूल टीकांचा भडिमार वाचून 'समाजस्वास्थ्य' मासिक आहे तरी काय? निवळ या कुतुहलानेंच प्रेरित होऊन ऑगस्ट १९२८ मध्यें नमुन्याचा अंक मागवून घेतला. तो वाचून पाहिल्यानंतर लगेच मी वर्गणीदारच झालों व मागील वर्षाचे सर्व अंक मागविले, परंतु त्यांतही ३ अंक कमीच मिळाले. एकंदर सर्व अंक वाचून पाहिल्यानंतर त्यांत इतकी टीका करण्यासारखें काय आहे, हें अजूनही मला समजलें नाहीं तें नाहींच. "पापी धर्मलंड प्रोफेसर्स आणि डॉक्टर्स" कोण याचा मात्र उलगडा झाला नव्हता तो झाला. पापी व धर्मलंड कां? मासिकास पुरे २०० ही वर्गणीदार नाहींत हें पाहून मात्र अतिशय आश्चर्य वाटलें. २ आणे, ३ आणे, ४ आणेमाला वगैरे अशा पुस्त-कांस ज्यांत वस्तुत: कांहींच नाहीं अशांचा खप वाटेल तसा व्हावा व समाज-स्वास्थ्यासारख्या खरोखरच जरूर अशा मासिकाच्या वर्गणीदारांची संख्या दोन-

त्यांवर जाऊं नये म्हणजे खरोखरच आश्चर्याची गोष्ट आहे. 'समाजस्वास्थ्यावर' अनुकूल अशा टीका तर क्वचितच दिसल्या पण प्रतिकूल टीकाचा मात्र जास्त भडिमार दिसतो.

आतां समाजस्वास्थ्य मासीकांतील आपलीं मतें सर्वांशीं जरी नाहीं तरी बहुतेकांशीं मला मान्य आहेत. हिंदुसमाजाचीं सध्यांचीं मतें पाहतां आपलीं मतें गळीं इतक्या लवकर उतरतील अशी आशाच नको. संततिनियमन सध्यांच्या काळीं जरी अतिशय आवश्यक असलें तरी 'मुलाच्या हातून पिंड मिळाला पाहिजे' ही कल्पना जोंपर्यंत आहे तोंपर्यंत तरी अशा लोकांना त्याची आवश्यकता कळणार नाहीं.

ज्यांना संततिनियमनाची आवश्यकता समजली आहे असे लोक निवळ त्याच्याकरतां औषध विकत आणण्यास येण्याकरतां लाजतात हें मला माहीत आहे. औषधाची जरूरीच आहे असें मलाही वाटत नाहीं. वीर्यपतनाचे वेळीं जर 'रेचक' केला ( म्हणजे पोटांतील सर्व हवा काढून टाकून अगदीं रिकामें ) तर गर्भ राहण्याचा क्वचितच संभव आहे. मला औषधाची जरूरी वाटत नाहीं.

मासिकांत प्रसिद्ध होणाऱ्या पत्रांत नांव गांव वगैरेंचा मुळीच पत्ता लागत नाहीं याचें कारण काय ?

पुढील प्रश्नांची उत्तरें द्याल अशी आशा आहे, १. मुष्टिमैथुनाची संवय असलेल्या मनुष्याचें लग्न झालेलें असलें तरीं नंतर त्याची ती संवय जात नाहीं असें कां ? २. संभोगांत नेहमीं पुरुषच नालायक कां ठरतो ? बायकोची कामतृप्ति त्याला मुळींच पुरी करतां येत नाहीं, ही गोष्ट बऱ्याच ठिकाणीं पुष्कळ अंशीं खरी आहे. याचें कारण काय ? ३. पुरुष बायकोवर बळजबरी करतो ही गोष्ट खरी आहे, त्याचप्रमाणें बायको नवऱ्यावर बळजबरी करते ही गोष्ट शक्य ( पाहिजे तर खरी ) आहे किंवा कसें ? कारण ? लहानपणीं बायका नवऱ्यास संभोगाविषयीं त्रास देतांना व नवऱ्याची संभोगाविषयीं नाखुषी असलेली प्रत्यक्ष पाहिली आहे, व या उदाहरणांपैकीं दोघांस दुसऱ्याकडून मुलें झालेलीं मला माहीत आहेत.

आपला

आ. वि. नि. सरनाईक.

[ आम्हांस शिव्या देऊन किंवा बोटें मोडून ज्यांचें समाधान होत असेल त्यांनीं तसें खुशाल करावें, आमची हरकत नाहीं. मैदानावर येऊन दोन हात करण्याची त्यांची छाती नाहीं इतकाच आम्ही त्याचा अर्थ समजतों. ' धर्मलंड ' ही आम्ही स्तुतीच समजतों.

वर्गणीदारांची संख्या आतां २०० च्या थोडीशी पुढें गेली आहे, व आतां नुकसान झालें तरी मासिक बंद करण्याचा आमचा विचार नाहीं.

' मुलाच्या हातून पिंड मिळाला पाहिजे ' अशी इच्छा असली तरीही त्याला पांचपंचवीस मुलांची जरूर नसते. संततिनियमनाचा आपण दिलेला मार्ग थोडासा दुर्बोध आहे. परंतु वीर्यपतन आंत झाल्यास त्याचा उपयोग नाहीं, व तें बंद झाल्यास प्रकृतीच्या दृष्टीनें धोक्याचें आहे. आपल्या अनुभवाचीं कारणें वेगळीं असूं शकतील.

यासंबंधीं पत्रें लिहिणाऱ्या लोकांची नांव गांव प्रसिद्ध करण्याची तयारी बहुधा नसते, तेव्हां त्यांनीं मुद्दाम तसें न कळवल्यास आम्ही नांव गांव प्रसिद्ध करीत नाहीं. असें करून तरी खऱ्या गोष्टी लोकांच्या नजरेस येणें इष्ट आहे. आपल्या प्रश्नांस उत्तरें:—

१. ही संवय बराच काळ राहून नंतर लग्न होऊन स्त्रीसमागम झाल्यास त्यापासून तितकें समाधान होत नाहीं व म्हणून ही संवय जात नाहीं. २. स्त्रियांचें उद्दीपन होण्यास पुरुषांपेक्षां जास्त वेळ लागतो व त्यामुळें असें होतें. एका रोमन् कॅथोलिक धर्मोपदेशकानें असें लिहिलें आहे कीं शेंकडा ९० प्रसंगीं स्त्रियांचें समाधान होत नाहीं कामशास्त्राचें थोडेंबहुत अध्ययन केल्यास असें होणार नाहीं. स्त्री निश्चल राहिली तरीही पुरुषाची तृप्ती होऊं शकते, यामुळें स्त्री कधींच नालायक ठरत नाहीं, मात्र तिला योनिमार्ग असला पाहिजे. कधीं कधीं योनिमार्ग व गर्भाशय हे दोन्ही नसतात परंतु अशा स्त्रियांचीही लग्नें होतात व नवऱ्याची फसगत होते. याकरतां लग्नापूर्वी दोघांनीही डॉक्टराकडून तपासून घेऊन सर्टिफिकीट घेण्याची चाल पाडणें इष्ट आहे. ३ पुरुषास इच्छा नसून निश्चल राहिल्यास समागमच अशक्य होईल, यामुळें त्यावर स्त्रियांसारखी बळजबरी होणें

शक्य नसतें. परंतु मनांत नसतांही स्त्री गळीं पडल्यामुळें पुरुष समागमास उद्युक्त होतात व स्वतःचें नुकसान करून घेतात. यास बळजबरी मात्र म्हणतां येणार नाहीं. कामशास्त्रदृष्ट्या वधूवरें एकमेकांस अनुरूप आहेत कीं नाहीं हें ठरवण्यास प्रत्यक्ष अनुभवाशिवाय मार्ग नसतो, म्हणून असे प्रकार होतात. या करतां घटस्फोटाची जरूर आहे, नाहींतर अशा स्थितींत जन्मभर दोघांचेही हाल होतात. सं.]

३

कृ. सा. न. वि. वि. × × ×

७-२-२९

×× चे ३-२-२९ च्या अंकांत खालील प्रमाणें जाहिरात आहे तरी त्याविषयीं आपलें मत आम्हांस कळविण्याची कृपा करावी.

## संततिनियमनाकरतां रामबाण औषध

अक्षय गुणकारी, कधींच फसत नाहीं. यानें अशक्त स्त्रियांची प्रकृति सुधारेल, आईचें दूध नासत नाहीं. एक पेटीस रु. १।, पत्ता: × × ×

[ ही जाहिरात निव्वळ फसवणुकीची दिसते-सं. ] × × +

---

येल् युनिव्हर्सिटींतील एका डॉक्टरानें दोन मुलींची हकीकत दिली आहे. पैकीं एकीला ३ वर्षें ७ महिन्यांची असतांना ऋतु प्राप्त झाला व तेव्हांपासून नियामितपणें मासिक स्राव सुरू झाला. ती ४ वर्षांची झाल्यावर प्रौढ स्त्रीसारखी दिसूं लागली. परंतु चेहरा आणि मानसिक वाढ मात्र वयाचे मानानेंच होती. दुसरी मुलगी ८ महिन्यांनीं उपजलेली होती. दोन वर्षांची असतां चालूं लागली, ८ वर्षें ३ महिन्यांची असतां ऋतुस्राव नियमित सुरू झाला, परंतु मानसिक वाढ मात्र नेहमींपेक्षां लवकर झाली नाहीं.

# प्रचलित विवाह.

[ हिंदुस्थानाप्रमाणेंच फ्रान्समधेंही आईबापांनीं मुलांचीं लग्नें ठरवण्याची वहिवाट आहे, यामुळें एका फ्रेंच लेखांतील खालील विचार येथेंही लागू पड-तात.—सं. ]

'कायहो, हल्लीं उत्तम लग्न कशाला म्हणतात?'—'जेथें दोघांचं प्रेम असेल, तें लग्न उत्तम.'—'विद्वान् आहांत, झालं!'—'तर मग सद्गुणी व्यक्ती-शीं लग्न केलं तर चांगलं...... '—'समजलं बस करा. आतां मी सांगतों हें लक्षांत ठेवा. श्रीमंतांच्या मुलीशीं लग्न करणं हें पुरुषाच्या दृष्टीनं चांगलं आणि नवऱ्याला भरपूर पगार असेल तर तें स्त्रीच्या दृष्टीनं चांगलं. चांगलं स्थळ याचा अर्थच मुळीं हा आहे!'

एखाद्या तिऱ्हाईत व्यक्तीबरोबर पैशाच्या लालचीनें जन्म घालवण्याचा करार करणें, हें उत्तम लग्न. लग्नाचा ठराव म्हणजे निव्वळ व्यापारी सवदा आहे. त्यांत किती फायदा होईल त्यावर जन्माचें सुख अवलंबून राहणार. प्रेम वगैरे लग्न झाल्यावर आपोआप येईल, त्याची काळजी नाहीं. रक्कम किती तें बोला.

आईबाप आपल्या सवडीप्रमाणें मुलीचें लग्न करतात. ती लग्न करीत नाहीं; तिचें लग्न होतें.

गलितावयव वृद्ध पतीची तरुण पत्नी म्हणजे रस्त्यांतल्या वेश्येपेक्षांही हीन आहे. 'काय घेणार?' असें वेश्येला विचारलें तर ती 'किती वेळ?' असें विचारते, व वेळाचे मानानें पैसे घेते. पण पत्नीला जन्मभर ठेवण्याची व पोस-ण्याची कबुली यावी, तेव्हां ती मिळते. वेश्या दुसरा धंदा करूं शकेल, पण पत्नी जन्माची विकलेली असते.

वेश्यांस थोडी बहुत लाज असते, पत्नीस लाजेचें कारणच नसतें, ती उघड पणें मिरवते.

हुंड्याकरतां घासघीस करणारा नवरा त्यांहीपेक्षां हलक्या प्रतीचा ठरेल.

वेश्यांच्या मिळकतीवर उपजीविका करणारास कायद्यानें शिक्षा होते. बायकोच्या कुंड्यावर उपजीविका करणाऱ्या नवऱ्याची किंमत त्याहीपेक्षां हलकी आहे.

पत्नी म्हणजे कायदेशीर रखेली असल्यास विवाह म्हणजे व्यभिचाराचा पायाच होतो व घटस्फोटांचीही संख्या वाढते. दोन आत्म्यांचें मीलन तर राहोच, पण विवाह म्हणजे दोन शरीरांचा सुद्धां नव्हे तर दोन थैल्यांचा समागम होतो. जेथें दोघांचें परस्पर प्रेम नसेल, अशा विवाहांत पतीला किंवा पत्नीला वेश्या समजलें पाहिजे, कारण त्यांपैकीं एकानें पैशाच्या किंवा इतर कारणानें आपलें शरीर विकलें असाच त्याचा अर्थ होतो. पैसा म्हणजे सुख नव्हे हें लोकांस पटेल तरच यांत सुधारणा होईल.

---

—स्त्रीपुरुषसमागमासंबंधींच्या प्रचलित कल्पनांत सुधारणा करण्याकरितां कोपेनहेगन येथें गेल्या जुलै महिन्यांत एक परिषद भरली होती. तेथें एक ठराव पास होऊन या उद्देशानें एक जगत्संघ स्थापन झाला आहे. याचें ऑफिस बर्लिन येथें असून या विषयावरील प्रसिद्ध लेखक कमिटीचे सभासद आहेत. ब्रिटिश हिंदुस्थानांत डॉ. व्ही. एल्. परमार व डॉ. एन्. रामचंद्र अय्यर हे कमिटीवर आहेत. या संघाचे उद्देश येणेंप्रमाणें:–( १ ) राजकीय, आर्थिक व समागमाच्या दृष्टीनें स्त्रीपुरुषांची समता, ( २ ) विवाह व घटस्फोट यांची धर्माच्या व कायद्याच्या जुलमांतून मुक्तता, ( ३ ) प्रजाजननाची जबाबदारी ओळखून संततिनियमन, (४) सुप्रजाजननानें मनुष्यजातीची प्रगति, (५) अविवाहित आयांचें व अनौरस मुलांचें संगोपन, ( ६ ) समसंभोगी किंवा इतर नियमबाह्य स्त्रीपुरुषांसंबंधीं समंजस धोरण, ( ७ ) वेश्यावृत्तीचा व गुप्त रोगांचा प्रतिबंध, ( ८ ) कामवासनेसंबंधीं बुद्धिभ्रंशास गुन्हे, दुर्गुण किंवा पाप न समजतां रोग समजणें; ( ९ ) दुसऱ्याच्या स्वातंत्र्याच्या आड येणारा समागम मात्र गुन्हा समजणें; व सज्ञान, वयांत आलेल्या दोन मनुष्यांचा राजीखुषीनें झालेला परस्पर संबंध म्हणजे ती त्यांची केवळ खाजगी गोष्ट समजणें; ( १० ) या विषयाचें पद्धतशीर शिक्षण.

× × ×

# नवीन लेखांतील विचार.

महात्मा गांधी यांनीं आपल्या 'यंग इंडिया 'मध्यें खालील पत्र छापलें आहे:—'मी विवाहित असून परदेशांत गेलों आहे. अशा स्थितींत माझ्या विश्वासांतील एका मित्रानें माझ्या बायकोस फूस लावली व तिला आतां गर्भ राहिला आहे. माझा बाप म्हणतो कीं तिनें आतां गर्भपातच केला पाहिजे, नाहीं तर कुळाची बेअब्रू होईल. परंतु मला हें चूक वाटतें. ती बिचारी पश्चात्तापानें झुरते आहे, खात पीत नाहीं व रडत असते. या बाबतींत माझें कर्तव्य काय हें मला कृपा करून सांगाल काय ? '

यावर गांधी म्हणतात:-अशीं उदाहरणें समाजांत थोडीं नसतात हें सर्वांस माहीत आहे तेव्हां याची नेमस्त चर्चा अस्थानीं होणार नाहीं. गर्भपात हा गुन्हा होईल असें मला स्पष्ट दिसतें. असंख्य पुरुषांच्या हातूनही अशा चुका होतात. परंतु त्यांना कोणी बोलत नाहीं व जाबही मागत नाहीं. शिवाय पुरुषाला आपलें पाप लपवतां येतें तसें स्त्रीला येत नाहीं. या स्त्रीची दया येते. नवऱ्यानें बापाचें न ऐकतां मूल शक्य तितक्या काळजीनें व प्रेमानें वाढवावें हें त्याचें कर्तव्य आहे. त्यानें बायकोजवळ रहावें कीं नाहीं हा प्रश्न नाजुक आहे. वेगळें राहणें कदाचित् न्याय्य होईल. असें झाल्यास त्यानें तिला पोटगी व शिक्षण देऊन शुद्ध राहण्यास मदत केली पाहिजे. परंतु तिचा पश्चात्ताप खरा समजून तिला जवळ ठेवणें चूक होणार नाहीं, इतकेंच नाहीं तर पश्चात्तापानें शुद्ध झालेल्या व पापाची शिक्षा भोगलेल्या स्त्रीस परत घेणें हें क्वचित प्रसंगीं कर्तव्यही होऊं शकेल.

त्याच अंकांत ( जानेवारी ३ ) पुढील पत्रही छापलें आहे:—मी १५ वर्षांचा आहे. माझी बायको १७ वर्षांची आहे. माझी मोठी पंचाईत झाली आहे. मी या विजोड लग्नाच्या प्रथमपासून विरुद्ध होतों. परंतु माझा बाप व चुलता यांनीं माझी तक्रार न ऐकतां उलट माझ्यावरच रागावून व शिव्या देऊन, व तिच्या

बापानें श्रीमंत घराण्याशीं संबंध जोडण्याच्या लालचीनें, मी अजून कोवळ्या वयाचा व तिच्यापेक्षां लहान असतांही, हें लग्न उरकून घेतलें. काय हा मूर्खपणा! असें विजोड लग्न करून मला खड्डयांत टाकण्यापेक्षां माझ्या बापाला गप्प बसायला काय झालें होतें? लग्नाच्या पुढच्या गोष्टी मला त्यावेळीं कळल्या असत्या, तर मी कधीं कबूल झालों नसतों.परंतु आतां तें होऊन गेलें. आतां मी काय करूं तें सांग.

यावर महात्माजी म्हणतातः—लेखकानें नांव गांव दिलें आहे, पण पत्र त्याच्यापर्यंत पोंचणार नाहीं म्हणून 'नवजीवन' मध्येंच उत्तर प्रसिद्ध व्हावें अशी त्याची इच्छा आहे. ही स्थिति शोचनीय आहे. या तरुणास धैर्य असल्यास त्यानें हें लग्न अजून नाकबूल करावें. या मुलाला व मुलीलाहि सप्तपदीचे वेळीं घेतलेल्या शपथांचा अर्थ समजणें शक्य नव्हतें. लग्नानंतर तीं कधीं एकत्र राहिलेलीं नाहींत. तेव्हां घरांतून बाप घालवून देईल त्यासही तयार होऊन त्यानें धैर्यानें हें लग्न नाकबूल करावें. या दोन्ही मुलांच्या आईबापांस माझी नम्र विनंति आहे कीं त्यांनीं आपल्या निरपराधी मुलांवर बिकट प्रसंग आणूं नये. पंधरा वर्षांचा मुलगा शाळेंत किंवा कारखान्यांत शिकत असायचा, गृहस्थाश्रमाचें हें वय नव्हे. आईबापांना आपल्या कर्तव्याची जाणीव होईल अशी आशा आहे. न झाल्यास मात्र त्यांस न जुमानतां विवेकबुद्धीला सयुक्तिक दिसेल तसेंच वागणें हें या मुलांचें स्पष्ट कर्तव्य आहे. [ परंतु नवऱ्यानें व बापानें टाकलेल्या मुलीचें पुढें काय होईल?—सं. ]

---

लंडन येथें अबदुल रहमान नांवाच्या हिंदी मनुष्यानें एक जाहीर पत्रक काढून 'संततिनियमनाची नवीन हिंदी पद्धत' शिकावयाची असेल त्यांनीं १० शिलिंग पाठवावे अशी लोकांस विनंती केली. एका मनुष्यानें पैसे पाठवले पण उत्तर आलें नाहीं म्हणून दिलेल्या पत्त्यावर जाऊन पाहतो तों अबदुल फरारी झाला होता.

× × ×

# ताजी व शिळी बातमी.

१९२८ सालीं मुंबई इलाख्यांतील जन्ममान दरहजारीं ३६·८५ होतें. शहरें वेगळीं घेतल्यास २९·१२ व खेड्यांत ३८·७३ होतें. सर्वांत अधिक पश्चिम खानदेश जिल्ह्यांत, ५१·८३; व सर्वांत कमी हैदराबाद जिल्ह्यांत १६·१९; मुंबई शहरांत १८·५४.

मृत्युमान इलाख्यांत २५·७२; शहरांत २६·५६ खेड्यांत २५·४९; मुंबई शहरांत २३·८३; सर्वांत जास्त सोलापूर जिल्हा ३४·६१; व सर्वांत कमी, मुंबई सबर्बन् ( आसपासचीं गांवें ) १६·५५.

प्रागतिक राष्ट्रांत जन्मांचें व मृत्यूंचेंही मान हजारीं ११–१२ चे सुमारें असतें. अधिक मुलें जन्मलीं म्हणजे मरतातही अधिक.

× × × ×

अमेरिकेंत क्लीव्हलंड्, ओहिओ येथील कूरिअस नांवाचे गृहस्थ व त्यांची बायको यांनीं जज्ज एव्हिंग यांचेकडे घटस्फोटाकरतां अर्ज केला. त्यांना तीन वर्षांत तीन मुलें झालीं होतीं. जज्जानें घटस्फोट मंजूर न करतां, त्यांनी तीन वर्षें संततिनियमन करावें असें फर्मावलें. तो म्हणाला, तीन वर्षांत तीन मुलें होतां कामा नये. पहिलें मूल १ वर्षाचें झाल्यावर तीं एका ( वयांत न आलेल्या तरुणांच्या ) कोर्टांत गेलीं होतीं. त्याच वेळीं तेथील जज्जानें त्यांस संततिनियमनाचा धडा द्यावयास पाहिजे होता. १९२३ सालीं कूरिअस् हे २२ वर्षांचे व त्यांची बायको १७ वर्षांची असतांना त्यांनीं पळून जाऊन लग्न केलें होतें.

× × ×

पार्वती नांवाची नाशिक जिल्ह्यांतील एक २० वर्षांची बाई ठाणें येथें एका रेल्वेच्या हमालाजवळ रखेली म्हणून राहिली होती. राघो गोविंद गायकवाड व लाल्या बापू जाधव या दोघांनीं तिला एका भाजीवालीच्या मार्फत फुसलावून मुंबईस

आणून एका कुंटणखान्यांत ठेविली या तिघांवर खटला होऊन लल्यास तीन व बाकी दोघांस अडीच महिने सक्तमजुरीची शिक्षा झाली, व हायकोर्टानें ती कायम केली. आरोपीतर्फे असें सांगण्यांत आलें कीं ती अगोदरच एकाची रखेली असून तिचा आणखी एक यार होता, यामुळें ती वेश्याच होती, तेव्हां तिला वेश्या बनवण्याकरतां मुंबईस आणली असें म्हणणें चूक आहे. जज्जांचे म्हणणें असें पडलें कीं 'वेश्या म्हणजे समागमाचा कायदेशीर हक्क नसलेल्या मनुष्यास पैशाचा मोबदला म्हणून आपलें शरीर देणारी स्त्री. रखेली तात्पुरती नसल्यामुळें ती वेश्या नव्हे, व तिला एखादा फालतू यार असला तरी ती वेश्या होत नाहीं.!' घाउक विक्रीनें रखेली किंवा पत्नी होते, किरकोळ विक्रीनें वेश्या होते.

× × ×

डॉ. पेडरसन् यांनीं लढाईच्या दिवसांतील खालील गोष्ट प्रसिद्ध केली आहे. एक वीसपेक्षां जास्त वर्षांची दिसणारी परंतु १८ वर्षांची मुलगी पुष्कळ जिने चढून एका मनुष्याच्या घरीं गेली व तेथें त्यांनीं समागम केला. हें तिनें खुषीनें केलें व तिच्यावर बळजबरी झाल्याचें विलकूल चिन्ह नव्हतें. नंतर तास दोन तास पर्यंत तीं शहरांत बसमधून हिंडलीं व नंतर त्याच्या घरीं जाऊन पुनः समागम करून नंतर तो तिला घरीं पोंचवावयास जात असतां तिची आई रस्त्यांत भेटली व तिनें त्याला पोलिसकडून गिरफतार करवला. अज्ञान मुलीशीं समागम केल्याबद्दल त्याला बरींच वर्षे तुरुंगाची शिक्षा झाली. या कामावर नेमलेल्या एका बाईनें त्या मुलीवर तीन आठवडेपर्यंत सारखी पाळत ठेवली व शेवटीं तिच्या रोजनिशींत तिच्या उनाडपणाचा पुरावा मिळाला. त्या मनुष्याला किती शिक्षा झाली याचें टिपण, व आणखी दोन तीन माणसांशीं ठरवलेलीं संकेतस्थानें वगैरे माहिती सांपडली. या लोकांना शिक्षा करवण्यांत तिला फुशारकी वाटत असे असें दिसतें. पहिला मनुष्य चांगला हुशार होता, परंतु दृश्य वयामुळें तो फसला. जाणून बुजून त्यानें कायदा मोडला नसता.